आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शुक्रवार, दिनांक २० सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. कारागीर बनण्याऐवजी उद्योजक होण्यावर लक्ष केंद्रित करण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं वर्ध्यातून आवाहन; अमरावती जिल्ह्यातील पीएम मित्र टेक्सटाइल पार्कचं ई- भूमिपूजन संपन्न.
2. मार्च २०२६ पर्यंत देशाला नक्षलवाद मुक्त करण्याचंसरकारचं उद्दिष्ट असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन.
3. आयुर्वेदात मॉडर्न ॲप्रोच आणि डिजीटल पायाभूत सुविधा निर्माण करणं आवश्यक असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं नागपुरात आवाहन.
4. स्टॅनफोर्ड विद्यापीठातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या जगभरातील दोन टक्के वैज्ञानिकांच्या यादीत नागपूर विद्यापीठातील गुरु शिष्य जोडीसह व्हीएनआयटीच्या ८ अध्यापकांचा समावेश.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी

सन्मान, सामर्थ्य आणि समृद्धी हे पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचं ध्येय असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. या योजनेला एक वर्ष पूर्ण झाल्या निमित्त वर्ध्यात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आधीच्या सरकारांनी कौशल्य आणि कारागिरांना प्राधान्य दिलं नाही. त्यामुळं विकासाच्या मार्गावरुन देश पिछाडीवर गेल्याचं ते म्हणाले. या योजनेचा सर्वाधिक लाभ अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांना होतो आहे. या समाजातल्या लोकांनी केवळ कारागिर बनून न थांबता उद्योजक बनण्यावर लक्ष केंद्रीत करावं असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. मोदी यांनी आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचं उद्घाटन केलं तसंच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेची सुरुवात केली. अमरावतीमधल्या पीएम मित्र टेक्सटाइल पार्कचं भूमिपूजनही, पंतप्रधानांच्या हस्ते आज झालं. या वेळी ते म्हणाले

*अमरावती में पीएम मित्र पार्क की आधारशिला भी रखी गई है । आज का भारत अपने टेक्सटाइल इंडस्ट्रीको वैश्विक भाजार में टॉप पर ले जाने के लिए काम कर रहा हु । देश का लक्ष है भारत की टेक्सटाइल सेक्टर के हजारो वर्ष पुराने गौरव को पूर्नस्थापित करना है । अमरावती का पीएम मित्र पार्क इसी दिशा में एक और बड़ा कदम है । मै इस उपलब्धि के लिए भी आप सभी को बहोत बहोत शुभकामनाये देता हु ।*

पंतप्रधान विश्वकर्मा योजनेच्या वर्धापन दिनानिमित्त, पंतप्रधानांनी इंडिया पोस्टनं प्रकाशित केलेल्या टपाल तिकिटाचं देखील अनावरण केलं. पंतप्रधानांनी पीएम विश्वकर्मा यांच्या एक लाखाहून अधिक लाभार्थ्यांना डिजिटल ओळखपत्र आणि डिजिटल कौशल्य प्रमाणपत्रे देखील जारी केली. याशिवाय ७५,००० लाभार्थ्यांना डिजिटल कर्ज मंजूरी पत्रे देखील जारी केली. "पारंपारिक व्यवसायाची उत्पादकता वाढवण्यासाठी साडेसहा लाखाहून अधिक लाभार्थ्यांना आधुनिक यंत्रसामग्री आणि टूलकिट प्रदान करण्यात आलं असल्याची माहिती यावेळी पंतप्रधानांनी दिली. कोणत्याही तारण वस्तू शिवाय तीन लाख रुपयांचं कर्ज देणाऱ्या कर्ज योजनेच्या फायद्यांविषयी त्यांनी सांगितलं. गेल्या एक वर्षात लाभार्थ्यांना १,४०० कोटी रुपयांचं कर्ज वाटप करण्यात आलं असून, या योजनेचे लाभार्थी, हे बहुतांश अनुसूचित जाती आणि जमातीतील असल्याचंही त्यांनी नमूद केलं. विश्वकर्मा योजनेत महाराष्ट्रात १ लाख ४६ हजार कारागिरांची नोंदणी झाल्याची माहित केंद्रीय लघु सूक्ष्म आणि मध्यम उद्योग मंत्री जितनराम मांझी यांनी कार्यक्रमात दिली. यावेळी राज्यासह संपूर्ण देशातून १८ लाभार्थ्यांना प्रतिनिधिक कर्ज देण्यात आलं. पंतप्रधानांच्या आशीर्वादानं महाराष्ट्राचा विकास बुलेट ट्रेनच्या वेगानं होईल हा विश्वास, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेलं परिवर्तन आम्ही राज्यात सुरू केलं. राज्यातल्या दोन लाख लोकांना, विश्वकर्मा योजनेची मदत झाल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. या कार्यक्रमातून साडेसहा लाख कुटुंबांचं चित्र बदलणार असून, त्यांच्यापर्यंत रोजगार पोहोचणार असल्याचं त्यांनी सांगितलं. अमरावतीच्या मित्र टेक्सटाइल पार्कमुळ इथल्या पांढऱ्या सोन्याला खरी किंमत मिळेल असं, उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. दरम्यान, वर्धा इथं स्वावलंबी महाविद्यालयाच्या मैदानावर आगमन होताच पंतप्रधांनी सर्वप्रथम थीम पॅव्हेलियन मधील कारागिरांशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या समापना नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागपूर विमान तळावरून दिल्लीकडे प्रस्थान केलं.

****

पी.एम.विश्वकर्मा

ग्रामीण आणि शहरी भागातील पारंपरिक कारागीर आणि हस्तकलेच्या लोकांना ओळख प्राप्त करून देण्यासाठी तसंच त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी केंद्र सरकारच्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्यावतीनं गतवर्षी पी.एम. विश्वकर्मा योजना कार्यान्वित करण्यात आली. या योजनेचा वर्षपुर्ती सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत वर्धा इथं आज संपन्न झाला. पी.एम. विश्वकर्मा योजनेंतर्गत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अठरा कलाकृतींचं प्रदर्शन, थीम पॅव्हेलियनमध्ये करण्यात आलं होतं. यात लाकडी माळा, जलपर्णी तसंच दगडापासून तयार केलेल्या विविध वस्तू, खेळणी, बाहुल्या अशा विविध कारागिरांनी तयार केलेल्या वस्तूंचे स्टॉल्स या प्रदर्शनी मध्ये लावलेले आहेत. पुढील दोन दिवस हि प्रदर्शनी नागरिकांसाठी खुली राहणार आहे. चंद्रपूरच्या स्वाती धोपकर या कारागीर महिलेनं आकाशवाणीशी बोलताना सांगितलं-

*आमचा हा जलपर्णीय हॅन्डिमेड स्टॉल आहे. वॉटर हयासिंथचा ज्या पासून विविध वस्तु आम्ही तयार करतो आहे. आमचा महिलांचा ग्रुप आहे. ज्या विश्वकर्मा आहे. आणि विश्वकर्मा मुळे एवढा मोठा फ्लॅटफॉर्म मिळालेला आहे. जे जलपर्णीय काढून फेकल्या जाते, त्या जलपर्णीय देठा पासून आम्ही उपयुक्त अश्या वस्तु बनविलेल्या आहे. ज्यामुळे महिलांना खूप मोठा रोजगार उत्पन्न झालेला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात जवळपास दोनशे महिला काम करीत आहे. मी सगळ्यांना आवाहन करते की अश्या उपयुक्त वस्तु खरेदी करून ईकोफ्रेंडली लाइफस्टाइल स्वीकारल्या पाहिजे.*

****

अमित शाह

मार्च २०२६ पर्यंत देशाला नक्षलवाद मुक्त करण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज म्हणाले. नक्षलग्रस्त भागातल्या, ५५ व्यक्तींची त्यांनी दिल्लीत भेट घेतली तेव्हा ते बोलत होते. छत्तीसगड मधील बस्तर इथल्या चार जिल्हे वगळता देशातून नक्षली नष्ट झाल्याचं ते म्हणाले. इतरांनीही शस्त्र टाकून, हिंसाचार सोडून शरण यावं असं, आवाहन त्यांनी केलं. सरकारच्या आवाहनाला प्रतिसाद न देणाऱ्यांच्या विरोधात, मोठी कारवाई करण्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला.

****

यूट्यूब चॅनल हॅक

भारतीय सर्वोच्च न्यायालयाचं अधिकृत यूट्यूब चॅनल आज हॅक करण्यात आलं. सर्वोच्च न्यायालय घटनात्मक खंडपीठांसमोर, सूचीबद्ध प्रकरणे आणि सार्वजनिक हिताच्या प्रकरणांची सुनावणी थेट प्रसारित करण्यासाठी युट्यूब चॅनेल वापरते. दरम्यान, चॅनेल हॅक झाल्यानं सर्वोच्च न्यायालयाच्या आय.टी.टीमनं एन.आय.सी.ची मदत मागितली आहे.

****

श्री विश्व व्याख्यानमाला - गडकरी

येणारा काळ आयुर्वेदासाठी अनुकूल आहे मात्र वेगानं पुढं जायचं असेल तर आयुर्वेदासाठी भविष्याचं व्हिजन तयार करावं लागेल. त्यासाठी यांत्रिक उपकरणं तयार करणाऱ्यां सोबत आयुर्वेदाचा समन्वय साधावा लागेल. आयुर्वेदात मॉडर्न अॅप्रोच आणि डिजीटल इन्फ्रास्ट्रक्चर व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे असं झाल्यास, लोकांचा आयुर्वेदाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेल असा विश्वास, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज व्यक्त केला. श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय आणि संशोधन केंद्र आणि, श्रीसद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, यांच्या संयुक्त विद्यमानं कवीवर्य सुरेश भट सभागृहात, श्रीविश्व व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेचे उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झालं. त्यावेळी त्यांनी हे विचार मांडलेत.

****

वैज्ञानिक यादीत नाव

अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठातील वैज्ञानिकांनी जगभरातील संशोधकांच्या स्कोपस डेटाबेसवरून माहिती घेऊन, त्यांचं स्कोपस मधील सायटेशन, एच-इंडेक्स आणि प्रकाशित शोध निबंधांची संख्या यावरून, जगभरातील दोन टक्के वैज्ञानिकांची यादी नुकतीच प्रकाशित केली आहे. यात भौतिकशास्त्र विषयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील, डॉ.संजय ढोबळे आणि डॉ.संजीव मोहरील या गुरु-शिष्यांच्या नावाचा समावेश आहे. डॉ.संजय ढोबळे हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात भौतिकशास्त्राचे वरिष्ठ प्राध्यापक आहेत तर, डॉ.संजीव मोहरील हे सेवानिवृत्त प्राध्यापक असून, ते २०१४ मध्ये सेवानिवृत्त झालेत. डॉ. संजीव मोहरील

यांचे स्कोपसवर ४२८ शोधनिबंध प्रकाशित आहे. त्यांनी एकूण ३६ विद्यार्थ्यांना पीएचडीसाठी मार्गदर्शन केलं आहे. त्यापैकी एक डॉ.संजय ढोबळे हे आहेत. याशिवाय, व्ही.एन.आय.टी.च्या केमिकल इंजीनियरिंगचे, डॉ.कैलास एल. वासेवार, इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन्स इंजिनिअरिंगचे, डॉ.अरविंद कुमार, भौतिकशास्त्रचे डॉ.बाबासाहेब आर.संकपाल, अप्लाइड मैकेनिक्सचे डॉ.मनमोहन दास गोयल, गणित विषयाचे डॉ.प्रदीप राउल, केमिकल इंजीनियरिंगचे डॉ.सचिन ए.मांडवगणे आणि डॉ.श्रीराम एस. सोनवणे, इलेक्ट्रिकल इंजीनियरिंगचे डॉ.मकरंद एस.बल्लाळ यांचा देखील या यादीत समावेश आहे.

****

मालविका

चीन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतलं मालविका बनसोड हीचं आव्हान संपुष्टात आलं असून, दोन वेळा विश्वविजेती ठरलेल्या जपानच्या, आकाने यामागुची हिनं मालविकाला उप-उपांत्यपूर्व फेरीत दोन सलग सेटमध्ये हरवत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. महिला एकेरीत ४३व्या क्रमांकावर असलेली मालविका बनसोड, ही सुपर १,००० बॅडमिंटन स्पर्धेत पी.व्ही.सिंधू आणि सायना नेहवाल यांच्या नंतर, उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचणारी तिसरी भारतीय महिला ठरली होती.

****

"स्वच्छता दौड"

'स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' या संकल्पनेस अनुसरून, केंद्र सरकारच्या “स्वच्छता ही सेवा' अभियांतर्गत, नागपूर महानगरपालिकेच्या वतीनं मनपा मुख्यालयात बावीस सप्टेंबर रोजी सकाळी साडेसहा वाजता, “स्वच्छता दौड”चं आयोजन करण्यात आलं आहे. यासाठी मनपाच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांच्या हस्ते, “स्वच्छता दौड”च्या टी-शर्टचं अनावरण करण्यात आलं आहे. गोयल यांनी युवा पिढीला भुरळ घालणाऱ्या, इन्स्टाग्राम, रिल्स, फेसबुक पेज, रेडिओ जॉकिज असे सोशल मीडियावर प्रभुत्व असलेल्या, इन्फ्लुएंसर यांची बैठक घेत त्यांच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांना स्वच्छतेचा संदेश जावा असं आवाहन केलं. यावेळी शहरातील जवळपास ३५ इन्फ्लुएंसर उपस्थित होते.

****

हवामान

विदर्भात आज वाशीम, बुलढाणा आणि अकोला वगळता सर्व जिल्ह्यांमध्ये, तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता नागपूरच्या हवामान विभागानं वर्तवली असून, सतर्कतेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या देखील विदर्भात सर्वत्र हलका ते अत्यंत हलका पाऊस पडू शकतो.

******